सम्मादिठ्ठीसमादान

शिक्षण प्रसारक संस्था, कवठेमहांकाळ

**PADMABHUSHAN VASANTRAODADA PATIL MAHAVIDYALAYA,**

**KAVATHE MAHANKAL, DIST – SANGLI**

# DEPARTMENT OF MARATHI

# FIELD-WORK

**(ACADEMIC YEAR: 2023-24)**

P.V.P. MAHAVIDYALAYA, K. Mahankal, Dist. Sangli.

**PADMABHUSHAN VASANTRAODADA PATIL MAHAVIDYALAYA,**

**KAVATHE MAHANKAL, DIST – SANGLI**

## DEPARTMENT OF MARATHI

# FIELD-WORK

**(ACADEMIC YEAR: 2023-24)**

### TITLE

*

**AN OBSERVATION OF THE LOCALITY IN THE LITERATURE OF AUTHOR CHARUTASAGAR AND A DISCUSSION OH HIS LITERATURE**

### PLACE

*

**Charutasagar Cultural Social Foundation,Malangaon,Tal-Kavathe Mahankal,Dist-sangli**

### DURATION

*

**FRIDAY, 05th JANUARY,2024**

**09.30am. to 01.00pm.**

P.V.P. MAHAVIDYALAYA, K. Mahankal, Dist. Sangli.

Shikshan Prasarak sanstha's

PADMABHUSHAN VASANTRAODADA PATIL MAHAVIDYALAYA

KAVATHE MAHANKAL, DIST – SANGLI

# DEPARTMENT OF MARATHI

## REPORT OF FIELD-WORK (2023-24)

| | |
|---|---|
| Title | **Charutasagar's Literature and Locality Observation** |
| Place | **Charutasagar Cultural Social Foundation,Malangaon,Tal-Kavathe Mahankal,Dist-sangli** |
| Day & Date | **Friday,05 January,2024** |
| Organizer | Department of Marathi |
| Participants | Teachers : 02, Students : 07 |
| Co-Ordinator | Dr.Mohan Londhe |
| Background | By knowing the literary writings of the rural writer Charutasagar, observing the locality in his literature. The cultural background, rural life, rural dialect etc. can be seen in his literature. |
| Objectives | 1) Familiarity with rural literature.<br>2) To prove the uniqueness of Charutasagara's literature.<br>3) To observe the premises that appear in their literature.<br>4) To explore their life history by discussing with their families and villagers. |
| Outcomes | 1) Observed the area depicted in Charutasagar's literature.<br>2) Visiting Charutasagar's residence, learned the secret of his life from his family.<br>3) Rural Life, Rural Dialect, Gavgada e. How it is portrayed in the literature of Charutasagar.<br>4) The form and concept of rural literature was actually visited and understood. |
| Conclusion | Charutasagar is a rural writer. He has depicted the rural area, rural dialect through his literature. Therefore, he has a valuable place in the history of rural literature. While studying his literature, the picture of rural life stands before the eyes. The students explored the life and literature of such a great writer. |

प्रा. डॉ. मोहन गोविंद लोंढे
एम.ए.,एम.फिल,पीएच.डी.
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय
कवठेमहांकाळ, जि. सांगली.

P.V.P. MAHAVIDYALAYA K. Mahankal, Dist. Sangli

**Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya**
Kavathe Mahankal, Dist.-sangli (Maharashtra) Pin-416405
Principal : Prof.(Dr.) M.K.Patil    Phone No.: 02341-222014
Website : www.pvpcollegekm.com    E-mail : kmpvp@rediffmail.com

---

PVPMKM/    Date : 02/01/2024

# -: नोटीस :-

मराठी विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की,मराठी विभागामार्फत एक दिवसीय क्षेत्र - कार्य (**Field-Work**) करण्यासाठी **'चारुतासागर सांस्कृतिक सोशल फाऊंडेशन, मळणगाव'** येथे **दि.०५ जानेवारी,२०२४** रोजी जाणार आहे. सदर क्षेत्र - **कार्य** सर्वांसाठी आवश्यक आहे.तरी सर्व विद्यार्थ्यांनी आपली नोंदणी प्रा.अर्जुन राठोड यांच्याकडे करावी.

P.V.P. MAHAVIDYALAYA * K. Mahankal, Dist. Sangli

प्रा. डॉ. मोहन गोविंद लोंढे
एम.ए.,एम.फिल,पीएच.डी.
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय
कवठेमहांकाळ, जि. सांगली.

Shikshan Prasarak Sanstha's

**Padmabhushan vasantraodada Patil Mahavidyalaya,Kavathemahankal**

# DEPARTMENT OF MARATHI

---

दि.३०/१२/२०२३

प्रति,

मा.अध्यक्ष,

चारुतासागर सांस्कृतिक सोशल फाऊंडेशन,

मळणगाव,ता. कवठेमहांकाळ,जि.सांगली

विषय :- क्षेत्र - कार्य भेट परवानगीबाबत

मा.महोदय,

मी आपणांस विनंती करतो की, दि.०५ जानेवारी,२०२४ रोजी सकाळी ०९:३० वाजता आपल्या संस्थेला भेट देणार आहोत.विद्यार्थ्यांना चारुतासागर यांच्या जीवनाविषयी व त्यांच्या साहित्याविषयी माहिती मिळावी.त्यांच्या साहित्यातून चित्रित झालेल्या परिसराचे निरीक्षण करून,त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन चर्चा करणार आहोत.चारुतासागर यांच्या साहित्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी तसेच,विध्यार्थ्यांमध्ये लेखन व वाचनाची आवड निर्माण व्हावी.हा उद्देश समोर ठेऊन आम्ही दोन प्राध्यापक व सात विध्यार्थ्यांना घेऊन आपल्या संस्थेला भेट देणार आहोत.विद्यार्थ्यांसाठी ही भेट महत्त्वपूर्ण आहे.

या भेटीसाठी तुमची संमती आणि परवानगी मिळावी ही विनंती.

कळावे,

Permission granted

Mundal

P.V.P. MAHAVIDYALAYA, K. Mahankal, Dist. Sangli

प्रा. डॉ. मोहन गोविंद लोंढे
एम.ए.,एम.फिल,पीएच.डी.
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय
कवठेमहांकाळ, जि. सांगली.

स्थापना : १७ जानेवारी २०१७

नोंदणी क्र. : महाराष्ट्र ६१/२०१७

# चारुता सागर सांस्कृतिक सोशल फौंडेशन, मळणगाव

ता. कवठे महांकाळ, जि. सांगली

जा.क्र. ०५/२०२४

दिनांक :

रजि. नं. महा/०१/२०१७ दि. १५/०२/२०१७

दि.०१/०१/२०२४

प्रति,

मा.प्राचार्य,

पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,

कवठेमहांकाळ,जि.सांगली

विषय :- क्षेत्र – कार्य भेटीसाठी परवानगीबाबत

संदर्भ :- दि.३०/१२/२०२३ चे पत्र

मा.महोदय,

आपल्या दि.३०/१२/२०२३ च्या पत्रानुसार आपण क्षेत्र – कार्य भेटीसाठी आमच्या 'चारुतासागर सांस्कृतिक सोशल फाऊंडेशन, मळणगाव,ता. कवठेमहांकाळ,जि.सांगली' येथे दि.०५/०१/२०२४ रोजी सकाळी ०९:३० वाजता भेट देण्यासाठी परवानगी मागितलेली आहे.तरी या या भेटीसाठी परवानगी देत आहे.

कळावे,

अध्यक्ष

सचिव

चारुता सागर सांस्कृतिक सोशल फौंडेशन
मळणगांव, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली.

# अहवाल

दिनांक २९ डिसेंबर,२०२३ रोजी मराठी विभागातील प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख यांची क्षेत्र – कार्य नियोजनाची बैठक पार पडली.दिनांक ३० डिसेंबर,२०२३ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम के पाटील यांनी क्षेत्र- कार्य साठी परवानगी दिली. आणि दिनांक ५ जानेवारी २०२३ रोजी क्षेत्र- कार्य भेट मळणगाव येथे आयोजित करण्यात आली. मळणगाव येथील साहित्यिक चारुता सागर यांच्या कुटुंबाशी आणि गावातील ग्रामस्थ यांच्याशी चर्चा करणे या उद्देशाने क्षेत्र -कार्य भेटीचे आयोजन करण्यात आले.

दिनांक ५ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ठीक ०९ :०० वाजता प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्र-कार्य भेटीसाठी महाविद्यालयातून निघालो. सदर क्षेत्र-कार्य भेटीमध्ये मराठी विभाग प्रमुख डॉ. मोहन लोंढे, प्रा. अर्जुन राठोड व विभागातील विद्यार्थी यांचा समावेश होता. सकाळी ठीक ०९:३० वाजता मळणगाव येथील चारुता सागर यांच्या घरी पोहोचलो. तिथे चारुता सागर यांच्या पत्नी श्रीमती मीरा दिनकर भोसले व त्यांचा मुलगा राजेंद्र भोसले यांच्याशी चारुता सागर यांच्या व्यक्तित्वासंबंधी आणि त्यांच्या आठवणी संबंधी सविस्तर चर्चा केली. त्यावेळेला राजेंद्र भोसले यांनी चारूतासागरांना मिळालेल्या विविध पुरस्काराची माहिती शिल्ड दाखवून विद्यार्थ्यांना दिली.त्यावेळेला गावातील ग्रामस्थांनी ही चारुता सागर यांच्या साहित्याची माहिती दिली.यावेळी नवोदित साहित्यिक दत्तात्रय शिंदे यांनी चारुता सागर यांच्या नागीण कथा संग्रहातील पांद व नागीण कथा संग्रहातील सर्व परिसराची माहिती सांगितली.तसेच चारुतासागर यांच्या साहित्यात आलेला सर्व परिसर विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहिला.या क्षेत्र-कार्य भेटीसाठी चारुतासागर संस्कृतिक सोशल फाउंडेशन,मळणगाव चे अध्यक्ष दत्तात्र्य क्षीरसागर यांनी मौलिक मार्गदर्शन केले.

चारुता सागर यांचे पुत्र राजेंद्र भोसले यांनी आमच्या विद्यार्थ्यांना चहापाणाची व्यवस्था केली. त्यावेळेला गावातील ग्रामस्थांनी चारुता सागर यांच्या लेखनाचे विविध पैलू उलगडून सांगितले. त्यांच्या कुटुंबांनी आणि ग्रामस्थांनी चारुता सागर यांच्या आठवणी जाग्या केल्या. अशा प्रकारच्या गप्पा मारताना विद्यार्थी रंगून गेले होते. चहापाणी झाल्यानंतर तेथून आम्ही कवठेमहांकाळ कडे येण्यासाठी निघालो. आणि ठीक दुपारी ०१:०० वाजता कवठेमहाकाळ मध्ये पोहोचलो.

अशाप्रकारे सदर क्षेत्र- कार्य भेट पूर्ण झाली. क्षेत्र कार्य भेटी मागचे उद्दिष्टे व हेतू खऱ्या अर्थाने सफल झाला. अशा प्रकारचे क्षेत्र-कार्य भेट प्रत्येक वर्षी आयोजित व्हावी अशी विद्यार्थ्यांकडून प्रतिक्रिया मिळाली.

- विद्यार्थ्यांना चारुतासागर यांच्या जीवनाविषयी व त्यांच्या साहित्याविषयी माहिती मिळाली.
- चारुतासागर यांच्या साहित्यात चित्रित झालेल्या परिसराचे निरीक्षण करून, विद्यार्थ्यांनी त्यांच्या विविध कथेवर चर्चा केली.
- चारुतासागर यांच्या निवासस्थानी भेट देऊन चर्चा करून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.
- चारुतासागर यांच्या साहित्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळाली.
- विध्यार्थ्यांमध्ये लेखन व वाचनाची आवड निर्माण झाली.

# चारुतासागर यांचा जीवनपरिचय

**प्रस्तावना :**

दिनकर दत्तात्रेय भोसले यांचा जन्म २१ नोव्हेंबर, १९३० रोजी झाला. व मृत्यू २९ मे २०११ मध्ये झाला. त्यांनी चारुता सागर या नावाने कथालेखन तर धोंडू बुवा या नावाने कीर्तने केलो. सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ जवळचे मळणगाव हे त्यांचे मूळ गाव तिथेच त्यांनी प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून नोकरी केली होती. राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त जोगवा हा मराठी चित्रपट चारुता सागर यांच्या दर्शन या कथेवर आधारलेला आहे. चारुता सागर हे ग्रामीण कथालेखक म्हणून सुपरचित आहेत. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील मळणगाव या गावी एका गरीब कुटुंबात झाला. तिथेच त्यांचे सातवी पर्यंतचे शिक्षण झाले. लहान वयातच पोथी पुराण कीर्तन यात ते रमायचे. ते अवघ्या १४ वर्षाचे असताना आईचे छत्र हरपले.

**भ्रमंती :**

आईच्या जाण्याचा धक्का त्यांना सहन झाला नाही. ते या परिस्थितीत असहाय्य झाले. त्यांच्या वडिलांचा भार कमी करण्यासाठी त्यांनी घर सोडण्याचा निर्णय घेतला. आणि पुढे १४ वर्ष दिसेल त्या वाटेने ते भारतभर पायी भटकत राहिले. अनेक गावं शहरे त्यांनी पालथी घातली. या काळात त्यांनी पोटाची खळगी भरण्यासाठी मिळेल ती कामे केली. एका शहरात तर अगदी बेवारसी प्रेत पुरायचं काम देखील त्यांनी केले. फूटपाथावर राहून दिवस काढण्याची वेळ त्यांच्यावर आली. कित्येकदा अपमानास्पद वागणुकीलाही त्यांना सामोरे जावे लागले. अशी काही वर्ष घालवल्यानंतर एका गावात ते काही दिवस स्थिरावले. भारत पाक फाळणीचा तो काळ होता. देशात दंगलीचे लोट पसरले होते. या काळात भारताने मोठ्या प्रमाणात सैन्य भरती करण्याचे ठरवले. त्यासाठी देशातील तरुणांना आवाहन करण्यात आले. चारुतासागर यांना वाटले की अशी छोटी-छोटी कामे करण्यापेक्षा सैन्यात का जाऊ नये? त्यांनी सैन्यात जाण्यासाठी अर्ज भरला. आणि त्यांची त्यात निवडही झाली. काही वर्ष सैन्यात सेवा केल्यानंतर त्यांनी परत मुलखात येण्याचा निर्णय घेतला. ते घरी आले पण घरच्या दैनावस्थेत फारसा फरक पडलेला नव्हताच. सैन्यात कमवलेले थोडीफार बेगमी त्यांनी घरासाठी खर्च केली. आणि पुन्हा घर सोडले.

आडमार्गाने ते चालत राहिले. एका डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या लहानशा खेड्यात ते पोहोचले. तिथे काही लहान मुलं नुसतीच हुंदडत होती. दगड मातीत खेळत होती. इथे शाळा नावालाही नव्हती. या मुलांना मार्गी लावण्यासाठी आपण शाळा काढली तर उगीच कुठेतरी भटकण्यापेक्षा हे काम बरं असं त्यांना वाटले. आणि त्यांनी हा बेत तिथल्या गावकऱ्यांना सांगितला. गावकऱ्यांना तो पसंतही पडला. त्या दिवसापासून तिथल्या चार मुलांना गोळा करून त्यांनी झाडाखाली शाळा सुरू केली. मुलं शिकू लागले आणि चारुता सागर यांचेही गावकऱ्यांचे जिव्हाळ्याचे संबंध तयार झाले. गावकऱ्यांच्या सुखदुःखाच्या गोष्टी ते ऐकू लागले. त्यांना ते वाट दाखवू लागले तिथेच शिक्षक म्हणून ते बराच काळ रमले.

**साहित्याची प्रेरणा आणि त्यांचे साहित्य :**

एकदा प्रवासात असताना शरद बाबूंची बडी दीदी ही कादंबरी त्यांच्या वाचनात आली. या लिखाणाने ते प्रचंड भारावले. मग शरद बांबूंचे सगळे साहित्य त्यांनी झपाट्याने वाचून काढले. पण त्या वेडापाई सारी रंगभूमी ही पालथी घातली. अनुभवांवर आधारित काही लेखन करण्याची उर्मी ही त्यांच्या मनात निर्माण झाली. पुढे अशाच एका पायी प्रवासात त्यांना एक बाई भेटली जी आपल्या आईच्या शोधात फुटेल त्या दिशेला रस्ता तुडवत चालली होती. त्या बाईच्या दुःखाने ते प्रचंड व्यतीत झाले. तिच्या दुःखाला त्यांनी शब्दांची वाट मोकळी करून दिली. आणि त्यांच्या हातून वाट ही पहिली कथा लिहिली गेली. पुढे त्यांनी

सातत्याने कथालेखन करायला सुरुवात केली. त्यांच्या नागिन या गाजलेल्या कथेमुळे मराठी साहित्य विश्वाला त्यांची ओळख झाली. त्या कथेला उत्कृष्ट कथेचे पारितोषिक मिळाल्यानंतर त्यांचा चांगलाच लौकिक तयार झाला. नागिन ही सर्वांच्या भीतीने जखडलेल्या चंद्रा नावाच्या तरुण स्त्रीची कथा आहे. नवरा बायकोच्या प्रेमाचं आणि नाग जोडीच्या वेगवान वासनेचे चारुता सागर यांनी वेधक वर्णन या कथेत केले आहे. पु.ल. देशपांडे यांनाही या कथेने भुरळ पाडली आणि त्यांनी या नवख्या लेखकाच्या कथेच्या जाहीर वाचनाचे काही प्रयोग पुण्या मुंबईत केले. अशीच त्यांची अजून एक गाजलेली कथा म्हणजे दर्शन. या कथेत त्यांनी जोगतीणींच्या आयुष्याचं स्तिमित करणारे दर्शन घडवले आहे. त्याच कथेवर आधारलेला जोगवा हा मराठी चित्रपट पुढे प्रदर्शित झाला.

सत्यकथा नियतकालिकात चारुता सागर यांच्या अनेक कथा प्रसिद्ध झाल्या. नागीण १९८६, नदीपार १९८६, मामाचा वाडा १९८६ साली अशा तीन कथा संग्रहातून त्यांच्या सुमारे ५० कथा प्रकाशित झाल्या आहेत. मोजक्याच पण अतिशय मार्मिक तरल अनुभूती देणाऱ्या कथा चारुता सागर यांनी लिहिल्या. या कथा साहित्य रसिकांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या. जी.ए. कुलकर्णी सारख्या श्रेष्ठ मराठी कथाकाराने त्यांच्या कथांची पारायणे केली. चारुता सागर यांनी मराठी कथेतील अनुभव विश्वाचं क्षितिज अधिक विस्तारित करण्याचे काम केले. दलित, शोषित, पीडित माणसाचं एक अनोळखी विश्व त्यांनी आपल्या कथांतून उभे केले. ग्रामीण स्त्रियांचे दुःख, लष्करी देशातील लोकांचे विश्व, तसेच साधू बैरागी, जोगती, पारधी, वैदू,डोंबारी, गारुडी, नंदीवाले, बेरड, प्रेत उचलणारे, वाटमारी करणारे अशा समाजातील अनेक दुर्लक्षित घटकांच्या जगण्याचा, त्यांच्या सुखाचा अतिशय खोलवर वेध त्यांनी आपल्या कथेतून घेतला. अभावाचं जीवन जगणारी ही माणसं जीवनाचे भोग निमुटपणे भोगत असतात मोडून न पडता परिस्थितीचा स्वीकार करत ती जगत राहतात. या माणसांचं विश्व त्यांनी अतिशय संवेदनशीलतेने वाचकांसमोर उभ केलं. गावगाड्यातील बदलत्या काळातील स्पंदनही त्यांनी आपल्या कथांतून सूक्ष्मपणे टिपली आहेत. मुक्या प्राण्यांची पाखड आणि त्यांचे माणसाशी असणारे नातेही त्यांनी अतिशय हळुवारपणे आपल्या कथांतून उभे केले.

लोकजीवन आणि लोकभाषा यांचा खराखुरा जिवंत अविष्कार करणारी त्यांची कथा सामाजिक वास्तवाचा तळ दाखवताना वाचकाला अस्वस्थ करून सोडते. जीवनाविषयी अपरंपार कुतूहल असलेल्या चारुतासागर यांनी मराठी ग्रामीण कथा खऱ्या अर्थाने समृद्ध आणि संपन्न केली. मराठी समीक्षकांनीही त्यांच्या कथांची म्हणावी तशी दखल घेतली नाही. पण सर्वसामान्य वाचकांच्या मनात त्यांच्या कथांनी कायमचं घर केलं. समाजातील एक ज्वलंत अनुभव विश्व आपल्या कथांतून साकारणाऱ्या या कथाकाराचे निधन २९ मे, २०११ रोजी वयाच्या 81 व्या वर्षी झाले.

P.V.P. MAHAVIDYALAYA * K. Mahankal, Dist. Sangli

प्रा. डॉ. मोहन गोविंद लोंढे
एम.ए.,एम.फिल,पीएच.डी.
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय
कवठेमहांकाळ, जि. सांगली.

**Shikshan Prasarak sanstha's**

**PADMABHUSHAN VASANTRAODADA PATIL MAHAVIDYALAYA**

**KAVATHE MAHANKAL, DIST – SANGLI**


# DEPARTMENT OF MARATHI

## FIELD-WORK (2023-24)


## Place- Charutasagar Cultural Social Foundation,Malangaon, Tal-Kavathe Mahankal,Dist-sangli




**चारुतासागर यांचे निवासस्थान. सोबत श्रीमती नीता दिनकर भोसले आणि पुत्र राजेंद्र भोसले.**




चारुतासागर यांची माहिती देत असताना श्री.राजेंद्र भोसले




चारुतासागर यांच्या साहित्यात आलेल्या परिसराची पाहणी,निरीक्षण आणि चर्चा करताना. सोबत नवोदित साहित्यिक दत्तात्र्य शिंदे आणि ग्रामस्थ

प्रा. डॉ. मोहन गोविंद लोंढे
एम.ए.,एम.फिल,पीएच.डी.
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय
कवठेमहांकाळ, जि. सांगली.

स्थापना : १७ जानेवारी २०१७ नोंदणी क्र. : महाराष्ट्र ६१/२०१७

# चारुता सागर सांस्कृतिक सोशल फौंडेशन, मळणगाव

ता. कवठे महांकाळ, जि. सांगली



जा.क्र. ०१/२०२४ दिनांक :

दि.०५/०१/२०२४

प्रति,

मा.प्राचार्य,

पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,

कवठेमहांकाळ,जि.सांगली

## क्षेत्र – कार्य भेट पूर्ण केलेला दाखला

दाखला देण्यात येतो की,मराठी विभाग,पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,कवठेमहांकाळ यांनी दि.०५/०१/२०२४ रोजी ०२ प्राध्यापक आणि ०७ विद्यार्थ्यांनी आमच्या संस्थेला भेट देऊन,यशस्वीपणे क्षेत्र – कार्य पूर्ण केलेले आहे.

अध्यक्ष सचिव

चारुता सागर सांस्कृतिक सोशल फौंडेशन

मळणगांव, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली.

**Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya**
Kavathe Mahankal, Dist.-sangli (Maharashtra) Pin-416405
Principal : Prof.(Dr.) M.K.Patil    Phone No.: 02341-222014
Website : www.pvpcollegekm.com    E-mail : kmpvp@rediffmail.com

---

PVPMKM/    Date : 05/01/2024

# Field – Work Completion Certificate

This is to certify that,a field-work organized by Department of Marathi, Padmabhushan vasantraodada Patil Mahavidyalaya,Kavathemahankal at **'Charutasagar Cultural Social Foundation,Malangaon,Tal-Kavathe Mahankal,Dist-sangli'** on dated 05/01/2024 has been completed satisfactorily.In this Field-Work 02 Teachers and 07 Students were participated.

प्राचार्य,
पद्म.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,
कवठेमहांकाळ,जि.सांगली.

**Shikshan Prasarak sanstha's**

**PADMABHUSHAN VASANTRAODADA PATIL MAHAVIDYALAYA**

**KAVATHE MAHANKAL, DIST – SANGLI**

## DEPARTMENT OF MARATHI

## FIELD-WORK (2023-24)

## Place- Charutasagar Cultural Social Foundation,Malangaon,

## Tal-Kavathe Mahankal,Dist-sangli

**Date-05/01/2024**

### Attendance

| Sr.No. | Name of the Students | Class | Sign |
|---|---|---|---|
| 1. | Kamble Gurupad Shivaji | B.A.III | [illegible] |
| 2. | Vishvajit Kisan Gorad | B.A.III | [illegible] |
| 3. | Shivaraj Shrikant Pawar | B.A.III | Pawar |
| 4. | Avadhut Dhanaji Mane | B.A.III | [illegible] |
| 5. | Deshinge Avishkar Bapu | B.A.III | A Deshinge |
| 6. | Shubham Prakash Lohar | B.A-III | [illegible] |
| 7. | Onkar Arun Desai | B.A.II | Onkar |
| 8. | | | |
| 9. | | | |
| 10. | | | |

P.V.P. MAHAVIDYALAYA K. Mahankal, Dist. Sangli

प्रा. डॉ. मोहन गोविंद लोंढे
एम.ए.,एम.फिल,पीएच.डी.
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय
कवठेमहांकाळ, जि. सांगली.